दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ •५२ • RNI : MAHMAR/2023/87818 • शुक्रवार दि.३१ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालय यांना ४०६६ आधार किट मिळणार

## माहिती तंत्रज्ञान विभागाची माहिती, पुण्याला मिळणार सर्वाधिक किट

**मुंबई (वृत्तसंस्था)**–राज्याच्या माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसाठी ४०६६ नव्या आधार किटचे वाटप करण्यात येणार आहे. येत्या १० फेब्रुवारी रोजी हे वाटप करण्यात येणार आहे. याची माहिती माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी दिली आहे. आशिष शेलार यांनी आज मंत्रालयात माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव पराग जैन नैनुटीया यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची बैठक घेतली.

नवीन आधार कार्ड काढणे, आधार कार्ड नूतनीकरण करणे, पत्ता बदलणे, अशा विविध सेवा देणारी ई सेंटर राज्यभर सुरू असून यासाठी लागणारी ३,८७३ आधार कार्ड किट सन २०१४ साली जिल्हाधिकारी कार्यालयाना उपलब्ध करून देण्यात आली होती. त्यापैकी सुमारे २,५५८ किट सध्या वापरात असून १,३१५ किट नादुरुस्त झाल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाकडून २,५६७ नव्या किटची मागणी करण्यात आली होती. याबाबत ग्रामीण भागातून आलेल्या मागण्या लक्षात घेत आढावा बैठक घेण्यात आली आहे.

आता येत्या १० फेब्रुवारी रोजी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात आधार किटचे वाटप केले जाणार आहे. सध्या युआयडीआय टेस्टिंगची प्रक्रिया सुरू आहे. पुणे जिल्ह्याला सर्वाधिक ३३८ किट देण्यात येणार आहेत, तर भंडारा जिल्ह्याला सर्वात कमी २३ किट देण्यात येणार आहेत. पुणेनंतर लातूरला सर्वाधिक २७१ किट देण्यात येणार आहेत. राजधानी मुंबई शहरात १०३ आधार किट देण्यात येणार आहेत.



### कोणत्या जिल्ह्याला किती आधार किट?

**अहिल्यानगरला ३४ अकोला ७८, अमरावती १०९, छत्रपती संभाजीनगर १३४, बीड ५८, भंडारदरा २३, बुलढाणा १२४, चंद्रपूर ७४, धुळे ११३, गडचिरोली ४४, गोंदिया ४८, हिंगोली ८८, जळगाव १६७ ,जालना १०४, कोल्हापूर १८८, लातूर २७१, मुंबई शहर १०३, मुंबई उपनगर १२२, नागपूर ९१, नांदेड ११२, नंदुरबार ९०, नाशिक ४९, उस्मानाबाद ७३ आणि पालघर जिल्हाधिकाऱ्यांना १५३, परभणी ५५, पुणे ३३८, रायगड ६३, रत्नागिरी ५९, सांगली १३०, सातारा १३२, सिंधुदुर्ग १६०, सोलापूर १४६, ठाणे ४००, वर्धा ५०, वाशिम १००, यवतमाळ ८३ किट उपलब्ध होणार आहेत.**

# १ ते ५ फेब्रुवारी दरम्यान जिल्हास्तरीय हिराई महोत्सव व मिनी सरस प्रदर्शन

## पालकमंत्री प्रा.डॉ.अशोक उईके यांच्या हस्ते होणार उद्‌घाटन

### दोनशेपेक्षा अधिक महिला स्वयंसहाय्यता समुह होणार सहभागी


**चंद्रपूर । प्रतिनिधी**

जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान व जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने, महिला स्वयंसहाय्यता समुहामार्फत उत्पादित वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीकरीता १ ते ५ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीत चांदा क्लब ग्राऊंड, चंद्रपूर येथे जिल्हास्तरीय हिराई महोत्सव व मिनी सरस प्रदर्शनी–२०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

प्रदर्शनीचे उद्घाटन १ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता आदिवासी विकास विभाग तथा पालकमंत्री प्रा. डॉ. अशोक उईके यांचे हस्ते पार पडणार आहे. या प्रदर्शनीमध्ये जिल्ह्यातील २०० पेक्षा अधिक महिला स्वयंसहाय्यता समुह सहभागी होणार आहे. दि. १ ते ५ फेब्रुवारी दरम्यान रोज सांयकाळी सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत.स्वयंसहाय्यता समुहांकडून उत्पादित वस्तूंना बाजारपेठ उपलब्ध होणाच्या दृष्टीने वस्तूंचे प्रदर्शन व विक्री महोत्सवाचे आयोजन केले जाते. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला स्वयंसहाय्यता समुहामार्फत उत्पादीत वस्तूंचे प्रदर्शन व विक्रीचे आयोजन म्हणजे ग्रामीण भागातील महिलांच्या अंगी असलेल्या कौशल्याचे प्रदर्शन व स्वत:मध्ये असलेला आत्मविश्वास वाढविण्यासाठीचा महत्वपूर्ण उपक्रम आहे. यामुळे महिलांमध्ये असलेल्या व्यावसायिक कलागुणांना वाव मिळते व कौशल्य वृध्दिंगत होते.चंद्रपूर शहरातील व ग्रामीण भागातील नागरिकांनी या प्रदर्शनीस भेट द्यावी, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.विविध गृहपयोगी उत्पादने असणार विक्रीस उपलब्ध : प्रदर्शनीमध्ये सहभागी गटाच्या माध्यमातून विविध गृहपयोगी उत्पादने विक्रीस उपलब्ध राहणार आहेत. यामध्ये लोणचे, विविध प्रकारच्या चटण्या, कडधान्य, मसाल्याचे पदार्थ, खाद्यपदार्थ, लांबपोळी, पुरणपोळी, झुनका भाकर, मोहाची भाकर, जवस चटण्या, मातीचे भांडे, लोकरी वस्तु, लाकडी शिल्प, शोभीवंत वस्तू, हातसळीचे तांदूळ, कापडी बॅग, टेराकोटा, गांडूळखत आदींचा समावेश आहे. या सोबतच स्वंयसहाय्यता समूहांचे खाद्यपदार्थांचे स्टॉल्स असणार आहेत. यात पुरणपोळी, शाकाहारी तसेच मांसाहारी जेवण, झुणका भाकर, लांब पोळया आदीचा समावेश आहे.

## हंसराज अहिरांनी महाकुंभमेळ्यात केले पवित्र स्नान

**चंद्रपूर– मौनी अमावस्येच्या शुभपर्वावर शंकराचार्य गोवर्धनपीठ स्वामी श्री अधोक्षजानंद देव तीर्थ जी महाराज यांच्या आशीर्वचनात राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष तथा पूर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांनी ज्येष्ठ बंधु हरिश्चंद्र अहीर यांचे समवेत प्रयागराज येथील पवित्र त्रिवेणी संगमात स्नान केले.**



# शेतकऱ्यांनो ! ग्रीस्टॅक योजनेअंतर्गत फार्मर आयडी तयार करा–जिल्हाधिकारी विनय गौडा

## १०० दिवस कृती आराखड्याअंतर्गत भेंडवी येथे पाहणी व संवाद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राज्य शासनाने निर्देशीत केलेल्या १०० दिवसांच्या कृती आराखड्याअंतर्गत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भेंडवी (ता. राजुरा) येथे भेट देऊन ऑक्सिजन पार्क, ग्राम ग्रंथालय व अंगणवाडीची पाहणी केली. तसेच शेतक–यांचा एकत्रित डाटाबेस तयार करण्यासाठी राबविण्यात येणा–या ग्रीस्टॅक योजनेंतर्गत फार्मर आयडी तयार करून घ्यावा, असे आवाहनही जिल्हाधिका–यांनी केले.

शासकीय योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी तसेच प्रत्यक्ष फिल्डवर जाऊन नागरिकांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी शासनाने १०० दिवसांचा कृती आराखडा तयार केला आहे. याअंतर्गत जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांनी भेंडवी (ता. राजुरा) येथे भेट दिली.

ग्रीस्टॅकचे महत्व सांगताना जिल्हाधिकारी श्री. गौडा म्हणाले, शेतक–यांचा व त्यांच्या शेतांचा, आधार संलग्न एकत्रित डाटाबेस तयार करणे, तसेच ग्रीसॅट योजनेंतर्गत शेतक–यांचा ७/१२, नाव व इतर तपशीलाची जोडणी आधार क्रमांकासोबत करायची आहे. यात हंगामी पिकांच्या माहिती संचानुसार शेतकरी आपल्या शेतीमध्ये असलेल्या शेतपिकाची नोंद ग्रीसॅट प मध्ये करू शकतील. त्यामुळे शेतक–यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी सीएससी सेंटर, महाऑनलाईन (सेतू) केंद्र या माध्यमातून मोफत नोंदणी करावी




किंवा https://mhfr. agristack. gov.in या संकेतस्थळावर जाऊन त्वरीत नोंदणी करावी. ग्रीस्टॅक योजनेच्या अंमलबजावणीसाठी गाव पातळीवर तलाठी, ग्रामविकास अधिकारी, कृषी सहायक यांच्या मार्फत प्रत्येक गावातील शेतक–यांचे मेळावे आयोजित करण्यात येणार आहे. या मेळाव्यामध्ये शेतक–यांचे ७/१२ व इतर तपशील यांची आधार सोबत जोडणी करून फार्मर आयडी तयार करण्यात येईल. तसेच गावनिहाय शेतकरी मेळाव्यांचे वेळापत्रक लवकरच प्रसिध्द करण्यात येणार आहे, असे जिल्हाधिका–यांनी सांगितले.यावेळी त्यांनी भेंडवी येथे ऑक्सिजन पार्क, ग्राम ग्रंथालय व अंगणवाडी ची पाहणी केली. तसेच बचत गटातील महिलांशी संवाद साधला. शालेय पोषण आहारबाबत आढावा घेऊन सर्व संबंधितांना आवश्यक सूचना केल्या व बालकांना वेळेवर पोषण आहार विशेषतः दूध व अंडी देण्याबाबत सूचित केले.

पाहणी दौरा दरम्यान राजुराचे तहसीलदार डॉ. ओमप्रकाश गोंड, गटविकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे, ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य, गट शिक्षणाधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, ग्राम विकास अधिकारी इत्यादी उपस्थित होते.

**ग्रीस्टॅक योजनेचे उद्दिष्ट :** १. शेतक–यांच्या शेतांचा, आधार संलग्न माहिती संच, शेतातील हंगामी पिकांचा माहिती संच तसेच शेताचा भुसंदर्भीकृत यांचा माहिती संच एकत्रितरित्या तयार करणे व सातत्याने अपडेट करणे. २. शेतक–यांच्या कल्याणसाठी केंद्र व राज्य शासनातर्फे राबविण्यात येणा–या विविध योजनांचा लाभ शेतक–यांना सुलभ, पारदर्शक पध्दतीने तसेच वेळेवर उपलब्ध करून देणे. ३. शेतक–यांना स्वस्त कर्ज, उच्च गुणवत्तेची कृषी निविष्ठा, विपणन, स्थानिक आणि विशिष्ट तज्ज्ञ मार्गदर्शन उपलब्ध करून देणे. ४. शेतक–यांना बाजार पेठेपर्यंत अधिक माहितीपूर्ण आणि सोयीस्कर प्रवेश मिळवून देणे. ५. विविध योजनांचा लाभ जलदगतीने देण्यासाठी व शेतक–यांची ओळख पटविण्याची पारदर्शक व सोपी पध्दत विकसीत करणे तसेच प्रमाणीकरणाची सुलभ पध्दत विकसीत करणे. ६. शेतक–यांना अधिक चांगल्या सेवा देण्यासाठी कृषी व संलग्न विभाग यांच्यात विविध योजनांच्या अभिसरण प्रक्रियेत सुलभता आणणे आणि ७. उच्च गुणवत्तेचा डेटा व ग्री टेकद्वारे कृषी उत्पादने आणि सेवांमध्ये नवकल्पना वाढविणे.

**योजनेचे फायदे :** १. पीएम किसान योजनेंतर्गत आवश्यक अटी पूर्ण करून अनुदान प्राप्त करण्यामध्ये सुलभता येईल. २. पीएम किसान योजनेंतर्गत पात्र सर्व लाभार्थी समाविष्ठ करून घेण्यास सहाय्य मिळेल. ३. किसान क्रेडीट कार्ड आणि कृषी इन्फ्रास्ट्रक्चर फंड व शेतीच्या विकासासाठी इतर कर्ज उपलब्ध करून घेण्यास सुलभता राहील. ४. पीक विमा तसेच आपत्ती व्यवस्थापन अंतर्गत शेतक–यांचे नुकसान भरपाईसाठी शेतक–यांचे सर्व्हेक्षण करण्यास सुलभता येईल. ५. किमान आधारभुत किमतीवर खरेदी मध्ये शेतक–यांचे नोंदणीकरण ऑनलाईन पध्दतीने होऊ शकेल. शेतक–यांसाठी कृषीकर्ज, वित्त, निविष्ठा आणि इतर सेवा देणा–या यंत्रणांना कृषी सेवा सहजपणे उपलब्ध होईल.

# राजकारण हे गोरगरीबांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे माध्यम–आ.मुनगंटीवार

## जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स पुणे येथे ८ वी युवा संसद; आ.सुधीर मुनगंटीवार यांना आदर्श आमदार पुरस्कार प्रदान

**पुणे । प्रतिनिधी**

राजकारणाबद्दल अनेकांच्या मनात नकारात्मक भावना असतात आणि अनेकजण त्या उघडपणे व्यक्तही करतात. मात्र, राजकारण केवळ निवडणुकांपुरते मर्यादित नसून ते गोरगरीबांच्या जीवनात आनंद निर्माण करण्याचे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री, आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी केले.ते पुणे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स येथे आयोजित आठव्या युवा संसदमध्ये बोलत होते. यावेळी आमदार सुधीर मुनगंटीवार यांना 'आदर्श आमदार पुरस्कार' प्रदान करण्यात आला. अशा पुरस्कारामुळे शंभरपट अधिक शक्तीने काम करण्याची ऊर्जा मिळते, अशी भावना यावेळी श्री. मुनगंटीवार यांनी व्यक्त केली. राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, माजी केंद्रीय राज्यमंत्री राज्यसभा सदस्य भागवत कराड, खासदार अरविंद सावंत, आमदार सत्यजित देशमुख, आमदार अमित गोरखे आदींसह इतर मान्यवर उपस्थित होते. आ. श्री. सुधीर मुनगंटीवार यांनी युवकांना अनेक उदाहरणे आणि कथांच्या संदर्भातून राजकारणाचे आणि त्यातील गांभीर्याचे महत्त्व पटवून दिले. राजकारण म्हणजे निवडणूक हा चुकीचा समज आहे. राजकारण हे केवळ निवडणुकीपुरते मर्यादित नाही. राजकारणाचा उपयोग समाजाच्या शेवटच्या व्यक्तीच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करण्यासाठी असावा असे आ. मुनगंटीवार म्हणाले. देश बदलायला हवा, देश पुढे जायला हवा, असे प्रत्येकाला वाटते मात्र हे साध्य करण्यासाठी प्रत्येकाने पुढे येण्याची गरज आहे. राजकारण त्या परिवर्तनाची संधी देते, असे सांगताना त्यांनी अनेक उदाहरणे दिली.राजकारणातून अनेक चिरकाल परिवर्तनकारी कार्य करण्याची संधी मिळते. राजकारणात न जाण्याचा सल्ला देणे हा चुकीचा भ्रम आहे. गोरगरीब, शोषीत वंचितांचे मन जिंकण्याचे माध्यम म्हणजे राजकारण आहे, असेही ते म्हणाले. युवा संसदेचे उत्तम आयोजन आणि नियोजनाबद्दल त्यांनी डॉ. सुधाकरराव जाधवर व शार्दुल जाधवर यांचे अभिनंदन केले. वनमंत्री असताना गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार समारंभात गेल्याची आठवण मुनगंटीवार यांनी यावेळी सांगितली.जनतेच्या हितासाठी कल्याणकारी निर्णय घेण्याचे कार्य राजकारणातून होते, असेही आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले.



# माती जिवंत तर शेती जिवंत-डॉ.प्रफुल्ल गाडगे

**पाथर्डी । प्रतिनिधी**

बदलत्या हवामानामध्ये शेतीत अमुलाग्र बदल करणे गरजेचे असून माती हाच शेतीचा कणा आहे. जर माती जिवंत असेल तरच भविष्यात शेती जिवंत राहील असे स्पष्ट मत बायोमी इनोवेटिव्ह लर्निंग फाउंडेशनचे प्रमुख डॉ. प्रफुल्ल घाडगे यांनी व्यक्त केले.



ममता कृषी सेवा केंद्र, बायोमी इनोवेटिव्ह लर्निंग फाउंडेशन आणि कृषी विज्ञान केंद्र दहिगाव यांच्या वतीने आज गुरुवार दि ३० रोजी आयोजित ऊस, केळी कांदा आणि इतर भाजीपाला पिके शेतकरी कार्यशाळेत ते बोलत होते. सदर कार्यशाळा शेवगाव येथील स्वराज मंगल कार्यालय येथे पार पडली.

यावेळी कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले, कृषी विज्ञान केंद्राचे विभाग प्रमुख माणिक लाखे कृषी सहाय्यक सुखदेव जमदाडे, बायोमी टेक्नॉलॉजीज कंपनीचे चीफ ऑफिसर उमेश भोसले, ममता कृषी सेवा केंद्र चे संचालक संदीप जावळे उपस्थित होते.

जैविक शेती हेच भारतीय शेतीचे भविष्य असून रेसिडयु फ्री अन्न खाण्याकडे लोकांचा कल वाढत आहे त्यासाठी जास्तीचे दोन पैसे देण्याची ग्राहकांची तयारी असून शेतकऱ्यांनी बाजारपेठेचा विचार करून कमी खर्चात आर्थिक उत्पन्न कसे काढता येईल याचा विचार करूनच भविष्यात शेती करावी असा सल्ला डॉ. गाडगे यांनी यावेळी उपस्थित शेतकऱ्यांना दिला.

तालुका कृषी अधिकारी अंकुश टकले यांनी सरकारी योजनांची माहिती देताना त्याचा शेतकऱ्यांनी फायदा करून घेण्याचे आवाहन केले. सरकारी कामाचे डिजिटलायझेशन सुरू होत असून पुढील काळात शेतकऱ्यांना कागदपत्रे घेऊन फिरण्याची गरज पडणार नाही त्यासाठी जवळच्या केंद्रात जाऊन त्यांनी आपल्या कागदपत्राची नोंदणी करून घेण्याच्या आवाहनही टकले यांनी यावेळी केले.

यावेळी माणिक लाखे यांनी शेतकऱ्यांच्या विविध समस्येवर माहिती दिली

कार्यक्रमाला उपस्थित बाळासाहेब मोरे, अशोक ताटे, बाळासाहेब फटांगडे, अभिजीत घुले, गोरक्षनाथ लांडगे यांनी बायोमी इनोवेटिव्ह लर्निंग फाउंडेशनच्या कृषी साक्षरता प्रशिक्षणतेचा लाभ झाल्याचे सांगितले.

यावेळी कार्यक्रमाला विष्णू घुगे, देविदास पातकळ, संतोष टाकळकर, नवनाथ लांडगे, अमोल देवढे, शरद डमाळ, मनीष गुंफेकर उपस्थित होते.

कार्यक्रमाला जवळपास १५० हून अधिक शेतकऱ्यांनी उपस्थिती लावली.

# आधार-शीला हॉस्टेलमध्ये गणतंत्र दिवस साजरा



**भंडारा । प्रतिनिधी**

नागपूर - आधार-शीला हॉस्टेल (मुलींचे एक घर) येथे २६ जानेवारी २०२५ रोजी गणतंत्र दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला हॉस्टेलचे संस्थापक डॉक्टर युवराज मेश्राम आणि डॉक्टर प्रज्ञा युवराज मेश्राम उपस्थित होते. त्यांनी सर्व मुलींना गणतंत्र दिवसाचे महत्त्व सांगितले, तसेच राष्ट्रप्रेम आणि एकतेचा संदेश दिला.

कार्यक्रमात मुलींनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले, ज्यामध्ये नृत्य, नाटक, आणि गीतांचा समावेश होता. यामुळे मुलींमधील सुप्त गुण आणि प्रतिभा बाहेर पडली. या उपक्रमामुळे मुलींच्या आत्मविश्वासात वाढ झाली आणि त्यांनी एकत्र येऊन साजरा केलेला हा दिवस त्यांच्या मनात कायमचा ठसा सोडून गेला.

गणतंत्र दिवसाच्या या उत्सवात सर्व उपस्थितांनी देशभक्तीचा जल्लोष केला, आणि हॉस्टेलच्या वातावरणात एक सकारात्मकता निर्माण झाली. आधार-शीला हॉस्टेलने अशा उपक्रमांच्या माध्यमातून मुलींमध्ये सामूहिकता आणि सृजनशीलतेला प्रोत्साहन देण्याचा संकल्प केला आहे.

# श्री समर्थ पॉलिटेक्निकमध्ये तणाव व्यवस्थापन कार्यशाळा उत्साहात संपन्न

**पारनेर । प्रतिनिधी**

श्री समर्थ पॉलिटेक्निकमध्ये तणाव व्यवस्थापन आणि नियोजन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. प्राध्यापक गिरीश कुकरेजा यांनी विद्यार्थ्यांना व उपस्थित शिक्षकांना तणाव हाताळण्याच्या प्रभावी तंत्रांवर मार्गदर्शन केले.

कार्यशाळेत ध्यानधारणा, सकारात्मक दृष्टिकोन, वेळेचे व्यवस्थापन आणि शारीरिक स्वास्थ्य राखण्याच्या तंत्रांचा समावेश करण्यात आला. यामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक आणि वैयक्तिक जीवन अधिक प्रभावीपणे जगण्यासाठी प्रेरणा मिळाली.

कार्यक्रमाला श्री समर्थ पॉलिटेक्निकचे प्राचार्य डी. डी. देसले, समर्थ इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्राचार्य एस. एस. शिंदे, शिक्षकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संस्थेचे संस्थापक कैलास गाडीलकर यांनी तणाव व्यवस्थापन विषयावर बोलताना सांगितले की, शैक्षणिक संस्थांमध्ये अशा कार्यशाळांचे आयोजन केल्याने विद्यार्थ्यांना तणाव हाताळण्याची तंत्रे समजतात आणि त्यांच्या शैक्षणिक कार्यक्षमतेत सुधारणा होते.




या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना तणावमुक्त जीवनाचा महत्त्वपूर्ण मंत्र मिळाला, तसेच उपस्थित शिक्षक व अतिथींनाही या कार्यशाळेतून प्रेरणा मिळाली.

कार्यक्रम प्राचार्य डी. डी. देसले यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीपणे पार पडला. संपूर्ण नियोजन प्रा. पी. डी. साबळे व प्रा. ए. एम. घोडके यांनी यशस्वीरित्या पूर्ण केले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये सकारात्मकतेचे नवे बीज पेरले गेले.

# प्रगतशील शेतीत नव्या वाटा-अर्जुन तांबे यांचा राज्यस्तरीय पुरस्काराने गौरव

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील खिर्डी येथील प्रगतशील शेतकरी अर्जुन वैजनाथ तांबे यांना त्यांच्या आधुनिक शेती प्रयोगांसाठी राज्यस्तरीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. ९ फेब्रुवारी रोजी हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.शेती पुरवडत नाही, या समजुतीला छेद देत अर्जुन तांबे यांनी आपल्या शेतीत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. त्यांनी आपल्या शेतात पॉलिहाऊस, ड्रीप सिंचन, शेततळे आणि हिंस्त्र प्राण्यांपासून संरक्षणासाठी तार कंपाउंड उभारले आहे. त्यांच्या एक एकराच्या पॉलिहाऊसमध्ये शिमला मिरचीची यशस्वी लागवड केली असून, ती पाहण्यासाठी पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने भेट देतात.अर्जुन तांबे हे केवळ प्रगतशील शेतकरीच नव्हेत, तर समाजसेवेचीही त्यांना आवड आहे.



शेतीपूरक आधुनिक अवजारे ते पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना उपलब्ध करून देतात, तसेच शेतीविषयक मार्गदर्शनही मोफत करतात.त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत त्यांना राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवले जात आहे.या यशाबद्दल पंचक्रोशीतील शेतकऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले असून, त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

# गंगाखेड येथे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांचा व्यापारी महासंघाच्या वतीने सत्कार



**गंगाखेड । प्रतिनिधी**

नांदेड परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या गंगाखेड दौऱ्यादरम्यान व्यापारी महासंघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. व्यापारी महासंघाचे अध्यक्ष दगडू सोमानी, कापड असोसिएशनचे अध्यक्ष अनिल यानपलेवार, किराणा असोसिएशनचे सचिव ज्ञानेश्वर अनंतवार, अडत असोसिएशनचे अध्यक्ष बंडू घुले, सीड्स अँड फर्टिलायझर असोसिएशनचे अध्यक्ष माऊली शिंदे, अध्यक्ष सचिन दहिवाळ, तुला असोसिएशनचे अध्यक्ष नंदू सोमानी, भांडे असोसिएशनचे अध्यक्ष कृष्णा येरावार, नाभिक संघाचे बालासाहेब पारवे, पांडुरंग नेजे, मेडिकल असोसिएशनचे शहराध्यक्ष कारभारी निरस, सचिव लक्ष्मण कोकडवार, सायकल मार्टचे संतोष राठोड, इलेक्ट्रिकल असोसिएशनचे अनिल आय्या, इलेक्ट्रॉनिक्स असोसिएशनचे विलास मंगरूळकर आदींनी श्री तिरुपती बालाजी भगवानची प्रतिमा देऊन शहाजी उमाप यांचा सत्कार केला.

# रोडमार्क फाउंडेशनचे संयोजक राजू वाघ यांचा नॅशनल मीडिया फाउंडेशनतर्फे सत्कार

**नागपूर । प्रतिनिधी**

पोरा, करू नको रेड सिग्नलवर घाई,
घरी वाट बघते रे तुझी जन्मदाती माई!

रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी नागपूरच्या विविध चौकांमध्ये हातात फलक घेऊन वाहतुकीचे नियम पाळण्याचे आवाहन करणाऱ्या रोडमार्क फाउंडेशनचे संयोजक राजू वाघ यांचा नॅशनल मीडिया फाउंडेशन, नवी दिल्लीच्या वतीने सत्कार करण्यात आला. नॅशनल मीडिया फाउंडेशनच्या ५२ व्या भारतीय पत्रकारिता स्थापना दिनानिमित्त वनामती सभागृहात आमदार कृपाल तुमाने यांच्या हस्ते त्यांना शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले.



राजू वाघ व त्यांच्या सहकाऱ्यांनी आतापर्यंत ८,००० अपघातग्रस्तांना मदत करून त्यांचे प्राण वाचवले आहेत. त्यांच्या रस्ता सुरक्षा मोहिमेने अनेक नागरिकांना वाहतुकीचे नियम पाळण्याची सवय लावली आहे.

या कार्यक्रमास लोकमत समूहाचे अध्यक्ष डॉ. विजय दर्डा, आमदार अभिजीत वंजारी, अतिरिक्त विभागीय आयुक्त माधवी खोडे, रोकडे ज्वेलर्सचे राजेश रोकडे, वरिष्ठ पत्रकार ओ. पी. यादव आणि राजेंद्र जैन आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी नॅशनल मीडिया फाउंडेशनचे महाराष्ट्र अध्यक्ष अमोल गुजर म्हणाले, आमच्या संघटनेमुळे महाराष्ट्र हा पत्रकारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र कायदा करणारा देशातील पहिले व एकमेव राज्य ठरले आहे.

डॉ. विजय दर्डा यांनी आपल्या भाषणात पत्रकारितेच्या जबाबदारीवर भर देत सांगितले की, पत्रकार आपला जीव धोक्यात घालून सत्य समोर आणतात. त्यामुळे लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाची विश्वासार्हता जपण्याची जबाबदारी पत्रकारांवर आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश पाठक यांनी केले, तर आभार प्रदर्शन मनीषा उमरेडकर यांनी मानले. कार्यक्रमात नागपुरातील अनेक मीडियाकर्मींनाही सन्मानित करण्यात आले.

# ग्रेगोरियन पब्लिक स्कूलमध्ये उस्ताद जोहर अली खान यांच्या संगीत मैफिलीला उत्स्फूर्त प्रतिसाद

**रायगड । ज्ञानेश्वर वाणी**

ग्रेगोरियन पब्लिक स्कूल, रोहा येथे जगप्रसिद्ध भारतीय शास्त्रीय व्हायोलिन वादक उस्ताद जोहर अली खान यांच्या संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले. ३० जानेवारी २०२५ रोजी झालेल्या या कार्यक्रमात तबला मास्टर उस्ताद झाकीर हुसेन यांचे शिष्य श्री निसर्ग देहूकर यांनीही आपल्या तबला वादनाने रंगत आणली.



उस्ताद जोहर अली खान यांनी आपल्या शास्त्रीय व्हायोलिन वादनाने मैफिलीची सुरुवात केली. व्हायोलिन आणि तबल्याच्या जुगलबंदीने संपूर्ण सभागृह मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर त्यांनी 'रघुपती राघव राजा राम' हे महात्मा गांधींचे प्रिय भजन, तसेच 'दमादम मस्त कलंदर' यासारखी भक्तीपर गीते सादर करून श्रोत्यांना संगीताचा आध्यात्मिक अनुभव दिला.

कार्यक्रमादरम्यान उस्ताद जोहर अली खान यांनी विद्यार्थ्यांना संगीताची महती आणि त्यातील शांती, प्रेम व एकतेचा संदेश समजावून सांगितला. संगीत ही ईश्वरी देणगी आहे, त्यामुळे सर्वांनी संगीत शिकावे, असा प्रेरणादायी संदेश त्यांनी दिला. त्यांच्या वादनातून भारतीय आणि विदेशी संगीताची सुंदर ओळख विद्यार्थ्यांना झाली.

कार्यक्रमाच्या शेवटी ग्रेगोरियन पब्लिक स्कूलचे उपमुख्याध्यापक फादर बिजॉय जॉर्ज यांच्या हस्ते उस्ताद जोहर अली खान यांचा शाल व स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच श्री निसर्ग देहूकर यांचा गौरव फादर विल्सन अब्राहम यांच्या हस्ते करण्यात आला.

संगीत मैफिलीच्या आयोजनात फादर जॉन मॅथ्यू, उप-प्रधानाचार्य, सेंट मेरी आय.सी.एस.ई. स्कूल, कोपरखैरणे यांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन श्रीमती मेघा विल्सन यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचा आनंद शाळेतील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी लुटला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रेगोरियन पब्लिक स्कूलच्या संपूर्ण टीमने मेहनत घेतली, त्यामुळेच ही संगीत मैफल शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा ठरली.

# झोडेगावचे भूमिपुत्र रघुनंदनगिरीजी महाराज यांच्या तपपूर्ती सोहळ्यास भक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



**गंगापूर । प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील झोडेगाव येथे महंत रघुनंदनगिरीजी महाराज यांच्या तपपूर्ती महासत्संग सोहळ्यास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे. श्री क्षेत्र सरला बेटाचे मठाधिपती महंत रामगिरीजी महाराज यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली ३० जानेवारी ते ६ फेब्रुवारी दरम्यान या भव्य सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक सोहळ्यास गावकरी, पंचक्रोशीतील भाविक, सेवेकरी आणि हजारो भक्तगण उपस्थित असून सत्संगामध्ये विविध धार्मिक कार्यक्रम, प्रवचने आणि पूजाविधी होत आहेत. भाविकांची वाढती संख्या लक्षात घेता विशेष व्यवस्था करण्यात आली असून भव्य मंडप, स्वतंत्र पार्किंग, पाण्याचा मुबलक पुरवठा, तसेच महिला आणि पुरुषांसाठी स्वतंत्र निवासव्यवस्था यांची सोय करण्यात आली आहे.

या सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी देणगी कमिटी, स्वागत कमिटी, स्वच्छता कमिटी, स्वयंपाक व अन्नदान कमिटी, महिला कमिटी आदी विविध समित्या कार्यरत असून स्थानिक युवकांनीही मोलाचा सहभाग नोंदवला आहे. छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर आणि परिसरातील हजारो सेवेकरी या सोहळ्यास हजेरी लावत आहेत, त्यामुळे झोडेगावात भक्तिभावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# शाळकरी मुलीचा अपहरण करण्याचा प्रयत्न ;शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे फसला

**वैजापूर । अर्जुन शिंदे**

वैजापूर तालुक्यातील मनेगाव येथे बुधवारी, २९ जानेवारी रोजी १६ वर्षीय शाळकरी मुलीचा अपहरण करण्याचा प्रयत्न झाला. शाळेच्या सुट्टीनंतर घरी जात असताना एका युवकाने छोट्या हत्ती वाहनातून तिच्या पाठीमागून गाडी थांबवली आणि तिला बेशुद्ध करून वाहनात टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु, स्थानिक शेतकऱ्यांच्या सतर्कतेमुळे हा प्रयत्न अपयशी ठरला.



घटना घडल्यानंतर तिथे उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांनी तत्काळ ग्रामस्थांना सूचना दिल्या. ग्रामस्थ तेथे जमा होऊन रस्ता अडवला. तथापि, अपहरण करणारा युवक मनेगावच्या रस्त्यांवरून वाहन घेऊन पुढे गेला. त्यानंतर ग्रामस्थांनी हसनखेडा रोडवर ट्रॅक्टर आडवून गाडी अडवण्याचा प्रयत्न केला. छोट्या हत्ती वाहनाने त्यावेळी सर्व गाड्यांना धडक देऊन पुढे जाण्याचा प्रयत्न केला.

पण, ट्रॅक्टरने रस्ता अडवला आणि वाहन चालक थांबला. ग्रामस्थांनी तत्परतेने वाहन चालकाला पकडून शाळकरी मुलीला सुरक्षितपणे बाहेर काढले. यानंतर शिऊर पोलिसांनी घटनास्थळी पोहोचून वाहन चालकाला ताब्यात घेतले.

या घटनेमुळे अपहरणाचा प्रयत्न अयशस्वी झाला आणि शाळकरी मुलगी सुखरूप घरी परतली. पोलिसांनी वाहन चालकावर कारवाई सुरू केली आहे.

# छावा मधील लेझीम नृत्याच्या प्रसंगाला कात्री दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचे राज ठाकरे यांच्या भेटी नंतर स्पष्टीकरण

**मुंबई । प्रतिनिधी**

प्रसिद्ध मराठी दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांच्या छावा चित्रपट'मधील लेझीम नृत्याच्या प्रसंगाला विरोध केल्याने राज ठाकरे यांच्या भेटीनंतर दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचे स्पष्टीकरण.

छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्याचा इतिहास मांडणारा बहुप्रतीक्षित 'छावा' या हिंदी चित्रपटाच्या ट्रेलरवरून वादंग निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. या चर्चेनंतर आणि राजकीय मंडळींसह अनेकांनी या प्रसंगाला घेतलेला आक्षेप विचारात घेऊन चित्रपटातील वादग्रस्त लेझीम नृत्याचा प्रसंग काढला जाणार असल्याचे दिग्दर्शक उतेकर यांनी स्पष्ट केले. तसेच हा चित्रपट प्रदर्शनाआधी इतिहासतज्ज्ञांनाही दाखविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



## ३२०२ रोहिंग्यांना परभणीतून जन्म प्रमाणपत्र..!

# किरीट सोमय्या यांनी महसूल प्रशासनास धरले धारेवर

**परभणी । लक्ष्मण उजगरे**

परभणी तालुक्यातून ३,२०२ बांगलादेशी रोहिंग्यांना जन्म प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले असून, हे अत्यंत गंभीर प्रकरण असल्याचे भारतीय जनता पार्टीचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी एका बैठकीत स्पष्ट केले. सोमय्या म्हणाले की, या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्यातील संबंधितांविरुद्ध कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच भविष्यात अशा बनावट प्रमाणपत्रांचा वितरण रोखले जावे.



सोमय्या मंगळवार २८ जानेवारी रोजी सुरक्षा रक्षकांच्या ताफ्याबरोबर जालन्याहून परभणीत दाखल झाले आणि जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, उपविभागीय अधिकारी दतू शेवाळे, तहसीलदार डॉ. राजापूरे यांच्यासह इतर अधिकार्यांबरोबर चर्चा केली. या चर्चेत सोमय्या यांनी परभणी सारख्या छोट्या विभागातून ७० वर्षांपूर्वी जन्मलेल्या व्यक्तींना गेल्या सहा महिन्यात जन्म प्रमाणपत्र वितरीत केल्यावर आश्चर्य व्यक्त केले.

सोमय्या यांनी सांगितले की, जन्म प्रमाणपत्र प्राप्त करणारे बहुतांशी रोहिंग्याच असू शकतात, आणि काही प्रमाणपत्र फक्त आधार कार्ड किंवा अस्पष्ट रेशन कार्डच्या आधारे प्राप्त झाले आहेत. हे प्रकार अत्यंत गंभीर असून, पुराव्यांच्या अभावात जन्म प्रमाणपत्र वितरीत करणे म्हणजे देशद्रोह आहे, असे ते म्हणाले.

सोमय्या यांनी प्रशासनाला सूचित केले की, भविष्यकाळात या प्रकारचे घोटाळे रोखण्यासाठी कठोर कारवाई केली जावी. तसेच, बांगलादेशी रोहिंगे पैसे देऊन व थातूर मातूर कागदपत्रे सादर करून महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांत जन्म प्रमाणपत्र मिळवण्यासाठी गँगचे कार्य सुरू आहे, याचे गांभीर्य ओळखून त्यावर तात्काळ नियंत्रण आणले पाहिजे.

सोमय्या यांनी या घोटाळ्याच्या विरोधात खटले दाखल करण्याची आणि पोलिस प्रशासनाने फौजदारी गुन्हे दाखल करण्याची सूचना केली.

या बैठकीला भाजपाचे उद्योग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रमोद वाकोडकर, महानगर जिल्हाध्यक्ष राजेश देशमुख, माजी नगरसेविका मंगल मुदगलकर, भाजपाचे नेते बाळासाहेब जाधव, संजय रिझवानी यांच्यासह अनेक नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते.

## करमाळा पोलीस स्टेशन कडून छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळास तालुक्यातुन प्रथम क्रमांक चे बक्षिस

**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा पोलीस स्टेशन कडून गणेश उत्सव काळात उत्कृष्ट देखावा व शांततेत श्री गणेश मिरवणूक काढल्या बद्दल सावंत गल्ली येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळास करमाळा पोलीस स्टेशन येथे उपविभागीय पोलिस अधिकारी अजित पाटील यांच्या शुभहस्ते प्रथम क्रमांकाचे प्रमाणपत्र मंडळाचे अध्यक्ष संदीप दुधाळ यांना देण्यात आले यावेळी पोलीस निरीक्षक विनोद घुगे, नायब तहसीलदार लोकरे, उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ गजानन गुंजकर, करमाळा नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन तपसे, सहकारी संस्थेचे उमेश बेंडारी गटविकास अधिकारी अमित कदम, सार्वजनिक



बांधकाम विभागाचे उप अभियंता अभिषेक पवार, भुमी अभिलेख उप अधीक्षक प्रिया पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला यावेळी मंडळाचे आधारस्तंभ सुनील बापू सावंत, मार्तंड सुरवसे पांडुरंग सावंत बापू उबाळे, गणेश सावंत,पियुष सावंत, शुभम चाँदगुडे, जय बिडकर ,शुभम कोंगे, गणेश किरवे, युवराज शिंदे,यश महाडिक, आझाद शेख,जमीर सय्यद आदी जण उपस्थित होते चालू वर्षी श्री गणेश उत्सव काळात सोलापूर जिल्हा ग्रामीण पोलीस दलाच्या वतीने आदर्श गणेश उत्सव संकल्पना, समाजामध्ये अभिमानास्पद काम, उत्कृष्ट देखावा, शांततेत मिरवणूक, तसेच सदर मंडळाचे सामाजिक कार्य , सार्वजनिक उपक्रम तसेच समाजामध्ये हिंदू मुस्लिम एकोपा जपणे या साठी बक्षीस ठेवण्यात आले होते यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज तरुण मंडळाने सोलापूर जिल्ह्यात तिसरा क्रमांक मिळविला असून करमाळा तालुक्यातुन प्रथम क्रमांक मिळाला असून याबद्दल मंडळाच्या पदाधिकाऱ्यांचे करमाळा शहरातील महिला व नागरिकांनी अभिनंदन केले व कौतुकही केले आहे.

## एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठाच्या बल्लारपूर आवारात महात्मा गांधीजींना श्रद्धांजली अर्पण

**बल्लारपूर । प्रतिनिधी**

दि. ३० जानेवारी २०२५, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या ७७वी पुण्यतिथी निमित्य एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ मुंबईचे, महर्षि कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुल, बल्लारपूर येथे त्यांच्या विचारांचे स्मरण करण्यात आले व याप्रसंगी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून श्रद्धांजली अर्पण करण्यात आले.

इंग्रजांच्या गुलामगिरीतून देशाला मुक्त करणाऱ्या महात्मा गांधी यांनी सत्य आणि अहिंसेच्या मार्गावर चालत स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या विचारांनी देशातील प्रत्येक नागरिकाला प्रेरणा दिली आहे. ३० जानेवारी १९४८ रोजी त्यांच्या निधनाच्या आठवणीसाठी हा दिवस हुतात्मा दिन म्हणून ओळखला जातो.या प्रसंगी बल्लारपूर आवाराचे संचालक डॉ. राजेश इंगोले यांनी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस वंदन करून त्यांच्या विचारांचे महत्त्व विषद केले. व विद्यार्थिनींना महात्मा गांधीजींच्या शांतता, अहिंसा आणि सत्याच्या शिकवणींचा अवलंब करण्याचे आवाहन केले.या प्रसंगी एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ बल्लारपुर सहाय्यक कुलसचिव डॉ. बाळु राठोड,समन्वयक डॉ. वेदानंद अलमस्त तसेच शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था महाराष्ट्र यासकडून बदलापूरकरांसाठी मोफत सुविधा

**बदलापूर । प्रतिनिधी**

जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्था ठाणे, पालघर, रायगड यांसारख्या विविध जिल्ह्यांमध्ये आपल्या कार्याचा ठसा उमठवताना ग्रामीण भागातील गरजू लोकांसाठी अत्यावश्यक सुविधांचा पुरवठा करत आहे. विशेषतः, या संस्थेने गरजूंना मोफत शिक्षण आणि रुग्णांसाठी मोफत उपचार उपलब्ध करून दिले आहेत. त्याचबरोबर अनेक ठिकाणी इंटरनॅशनल स्कूल्स, कॉलेजेस आणि हॉस्पिटल्सची स्थापना केली आहे. यामुळे संस्थेचे संस्थापक निलेश सांबरे यांनी समाजासमोर एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.



मंगळवारी, भावनादेवी भनवान सांबरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने, जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेने बदलापूरकरांसाठी एक अनोखी सुविधा सुरू केली. या सुविधांमध्ये सोनोग्राफी सेंटर, पॅथॉलॉजी सेंटर, आणि एमपीएससी/यूपीएससी तयारीसाठी मोफत वाचनालय आणि आरोग्य क्लिनिक यांचा समावेश आहे. या सुविधांमुळे बदलापूरमधील गरजू नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना मोठा फायदा होणार आहे.

दिगेश पवार, जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे प्रतिनिधी, म्हणाले, ग्रामीण भागातील एमपीएससी आणि यूपीएससी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मुंबईसारख्या मोठ्या शहरात जाण्याची आवश्यकता होती, पण आता संस्थेच्या वाचनालयामुळे त्यांना आपल्या गावातच तयारी करता येईल. याशिवाय, गरजूंना मोफत आरोग्य सेवा मिळण्याचा फायदा देखील मोठा आहे. या उपक्रमामुळे बदलापूरमधील ग्रामीण आणि शहरी सर्व गरजूंना मदत मिळणार आहे.

या उपक्रमामुळे जिजाऊ शैक्षणिक व सामाजिक संस्थेने आपल्या कार्याची एक नवा पर्व सुरू केली आहे, ज्यामुळे अनेक गरजू आणि विद्यार्थ्यांना आधार मिळणार आहे.

## जय भवानी तरुण मंडळला उत्कृष्ट कार्या बद्दल करमाळा पोलिसांकडून प्रशस्ती पत्र व ट्रॉफी देऊन गौरविण्यात आले



**सोलापूर । प्रतिनिधी**

करमाळा ठाणे पोलिसांनी सोलापूर ग्रामीण गणेश उत्सव २०२४ बक्षीस वितरण समारंभात उमरड येथील जय भवानी तरुण मंडळ यांना एक गाव एक गणपती बसवून आदर्श निर्माण करण्याबद्दल प्रशस्तीपत्र व ट्रॉफी देऊन गौरवले. मंडळाने गावामध्ये वृक्षारोपणाचे उत्कृष्ट काम केले आहे आणि गणपती मंदिर उभारणीचे काम देखील सुरू आहे. या सर्व कामांची दखल घेऊन पोलीस निरीक्षक घुगे साहेब यांनी मंडळाला सन्मानित केले.


या उपक्रमाच्या माध्यमातून, मंडळाने सामाजिक बांधिलकीचा आदर्श ठेवला आहे. पोलीस निरीक्षक घुगे साहेब यांनी जय भवानी तरुण मंडळाला पुढील काळात व्यसन मुक्त अभियान व वृक्षारोपण अभियान राबवण्याची मार्गदर्शक सूचना केली.

यावेळी जय भवानी तरुण मंडळाचे अध्यक्ष गोवर्धन कोठावळे, अण्णा पठाडे, बाप्पू बदे, मनोज पठाडे, आणि पोलीस पाटील अंकुश कोठावळे यांसह मंडळाचे सदस्य उपस्थित होते.

## शिंगीतील ५० वर्षीय महिलेवर धारदार शस्त्राने हल्ला; मृत्यूशी झुंज देत असलेल्या महिलेच्या प्रकरणात संशयिताला अटक

**गंगापूर । प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील शिंगी येथे एका ५० वर्षीय महिलेवर अज्ञात हल्लेखोराने धारदार शस्त्राने वार करून तीला गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. अलिशा निजाम शेख (५०) या महिलेवर पहाटे प्रात:विधीसाठी जात असताना हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात त्या गंभीर जखमी झाल्या असून, त्यांच्यावर संभाजीनगर येथील वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



२९ जानेवारी रोजी पहाटे ५:३० वाजताच्या सुमारास अलिशा शेख यांच्यावर अज्ञात हल्लेखोराने धारदार शस्त्राने सपासप वार केले. मानेवर, तोंडावर, डोक्यावर आणि हातावर गंभीर जखमा झाल्यानंतर त्यांना तातडीने गंगापूर उपजिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर त्यांना अधिक उपचारासाठी संभाजीनगर येथे पाठविण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच गंगापूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक कुमारसिंग राठोड, पोउनि प्रमोद काळे, बीट अंमलदार मनोज घोडके, संदीप राठोड, पदमकुमार जाधव यांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरू केला. घटनास्थळी श्वानपथक आणि ठसेतज्ज्ञांना पाचारण करण्यात आले.

श्वानपथकाने शोध घेत गावातील शेकुर मुसा शेख (२५) याच्या घरापर्यंत माग काढला. पोलिसांनी तपास सुरू केला असता संशयित फरार असल्याचे आढळले. झोडेगाव येथे काही युवकांनी रस्त्याने चालत जाणाऱ्या तरुणाला संशयास्पद वाटल्याने त्याची विचारपूस केली आणि गंगापूर पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर उपनिरीक्षक प्रमोद काळे व मनोज घोडके यांनी आरोपीला अटक केली.

जखमी महिलेचे पती निजाम छोटू शेख (६०, रा. शिंगी) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात हल्लेखोराविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात भादंवि कलम ११८ (२) आणि १०९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आश्विनी कुंभार करीत आहेत.

शांत असलेल्या शिंगी गावात या घटनेमुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पोलिसांनी तातडीने तपास करून आरोपीला अटक केल्याने गावकऱ्यांनी पोलिसांचे आभार मानले आहेत.

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे भिवंडीतील आगरी महोत्सवला उपस्थिती राहून समाजाशी संवाद साधला

**ठाणे । प्रतिनिधी**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही भिवंडी शहरामध्ये मोठ्या उत्साहात आगरी महोत्सव २०२५ सुरू झाला आहे. या महोत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्रातील आगरी कोळी संस्कृतीचे विविध खाद्यपदार्थ, आकाश पाळण्याचा आनंद आणि समाजातील रूढी-प्रथांचा अनुभव. आगरी समाजाच्या परंपरांचा साक्षात्कार घडवणारा आणि विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून आगरी सांस्कृतिक सौंदर्य दाखवणारा हा महोत्सव मोठ्या प्रमाणात लोकांना आकर्षित करत आहे.



राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी महोत्सवाला उपस्थित राहून आगरी समाजाच्या बंधू-भगिनींना शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्याशी संवाद साधला. या वेळी, महोत्सवाच्या भव्यतेला सलाम करत, शिंदे यांनी याप्रसंगी आगरी महोत्सवाच्या महत्त्वावर प्रकाश टाकला. त्यांचे म्हणणे होते की, आगरी महोत्सव हे राज्यातील नंबर एक महोत्सव असून, हे आपल्या स्थानिक आगरी भाषा आणि संस्कृतीला प्रगल्भतेने जपते.

महोत्सवाच्या उद्घाटनानंतर, शिंदे यांनी आई एकविरा देवीचे दर्शन घेतले आणि मंदिराच्या स्थापनेसाठी आयोजकांचे अभिनंदन केले. याप्रसंगी कार्लासारखेच हुबेहूब मंदिर उभारण्यात आले होते. आगरी समाजाच्या विविध खाद्यपदार्थांची चव चाखता येणार असून, स्थानिक कलांचा अनुभव घेण्याची संधीही उपस्थितांना मिळते.

महोत्सवाच्या निमित्ताने क्रीडा, साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आगरी समाजाच्या व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. विशेषतः शिवसेना नेते प्रकाश पाटील यांचा सन्मान करण्यात आला, ज्यांनी सर्वसामान्य शिवसैनिकांपासून शिवसेना नेतेपदावर पोहोचण्याचा अप्रतिम प्रवास केला. शिंदे यांनी महोत्सवाच्या आयोजकांचे कौतुक करत सांगितले की, गेल्या १४ वर्षांपासून यशस्वीपणे होणारे आगरी महोत्सव हे समाजाच्या एकात्मतेचे प्रतीक आहेत.

या प्रसंगी माजी केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील, शिवसेना नेते प्रकाश पाटील, आमदार शांताराम मोरे, आगरी महोत्सवाचे संस्थापक अध्यक्ष विशुभाऊ म्हात्रे, आध्यक्ष दयानंद चोरगे आणि महोत्सवाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीदेवीचा माळ ग्रामपंचायतमध्ये प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

**सोलापूर । करमाळा**

करमाळा तालुक्याचे आराध्य दैवत आई कमला भवानी मंदिर परिसरातील श्रीदेवीचा माळ ग्रामपंचायत कार्यालयात २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण करण्यात आले.



ग्रामपंचायतीच्या ध्वजारोहण कार्यक्रमात नूतन सरपंच वेणूबाई संतोष पवार यांच्या हस्ते ध्वज फडकवण्यात आला. यावेळी श्रीदेवीचा माळ तंटामुक्त समिती अध्यक्ष सचिन भाऊ चोरमले, उपसरपंच सचिन शिंदे, ग्रामपंचायत सदस्य, माजी सरपंच, ग्रामसेवक दत्तात्रय जाधव, सिद्धेश्वर सोरटे, जयराम तात्या सोरटे, प्रभाकर सोरटे, अमोल चव्हाण, महेश सोरटे, प्रभाकर फलफले यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. गावातील सर्व नागरिक, ग्रामस्थ आणि ग्रामपंचायत कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रजासत्ताक दिनाचा उत्साह अनुभवला.




**पाथरीचे उपविभागीय अधिकारी शैलेश लाहोटी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना सह्याद्रीचा राखणदार बातमीदार लक्ष्मण उजगरे परभणी**

## भिगवण पोलिसांची मोठी कारवाई - ८.३० लाख रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**भिगवण । प्रतिनिधी**

भीमा नदी पात्रातील मच्छिमारांच्या बोटींचे इंजिन आणि साहित्य चोरी करणाऱ्या दोघांना भिगवण पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी केलेल्या या कारवाईत चोरीस गेलेला ८,३०,२०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



२६ जानेवारी २०२५ रोजी अनिल धुमाळ यांच्या होंडा कंपनीच्या ५ क्क्ष, १६० उउ बोट इंजिन चोरले गेले होते. या चोरीचा गुन्हा खझउ ३०३(२) अंतर्गत भिगवण पोलिसांत दाखल करण्यात आला. तपासाच्या दरम्यान पोलिसांनी उउढत फुटेज, त्रझड डाटा, आणि गोपनीय बातमीदारांच्या माहितीच्या आधारे दोन आरोपींचा छडा लावला.

पोलिसांनी दत्तू हिरामन घटे (वय ३८) आणि रमेश हिरामन गव्हाणे (वय ३७) या दोघांना अटक केली. त्यांनी चोरी केलेला मुद्देमाल ४ बोट इंजिन, १ लोखंडी बोट ही सर्व वस्तू ८,३०,२०० रुपये असा मुद्देमाल जप्त केली.

या कारवाईत पोलीस अधीक्षक पंकज देशमुख, अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली विनोद महांगडे, सहा. पोलिस निरीक्षक आणि त्यांच्या पथकाने अत्यंत कुटुंबिक पद्धतीने तपास करून आरोपींना ताब्यात घेतले. गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस अंमलदार विठ्ठल वारगड करीत आहेत.

# भव्य कृषी विकास परिषद व प्रदर्शन; शेतकऱ्यांसाठी नवतंत्रज्ञानाचा प्रांगण

**भंडारा | प्रतिनिधी**

भंडारा, दि. ३० : कृषि विभाग भंडारा, कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा), भंडारा, व कृषि संलग्न विभाग यांचे संयुक्त विद्यमाने दि. ०२ ते ०५ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत मौजा पिंपळगाव/सडक, ता. लाखनी, जिल्हा भंडारा येथे भव्य कृषि विकास परिषद, कृषि प्रदर्शन तसेच जिल्हा पशुसंर्वधन विभागामार्फत पशुपक्षी प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. पिंपळगाव सडक येथील शंकरपटाच्या शताब्दी महोत्सवानिमित्त सदर कृषि विकास परीषद व कृषि प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.या कृषि प्रदर्शनाचे उद्घाटन रविवार दि. ०२ फेब्रुवारी २०२५ रोजी संजय सावकारे, मंत्री वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, भंडारा यांचे शुभहस्ते होणार आहे. उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कविता उइके, अध्यक्ष, जि. प. भंडारा भूषवितील.

कृषि प्रदर्शन, पशुपक्षी प्रदर्शन, उत्पादक ते ग्राहक थेट विक्री, कृषि व संलग्न व्यवसायाबाबत चर्चासत्र व परीसंवाद, शेतकरी सन्मान समारंभ, महिला बचत गट निर्मित वस्तुंचे प्रदर्शन व विक्री ही प्रदर्शनाची ठळक वैशिष्ट्ये आहेत. प्रदर्शनात शेती उपयोगी औजारे, सिंचन साधने यांचे स्वतंत्र दालन, कृषि निविष्ठा, सेंद्रिय पध्दतीने उत्पादीत शेतमाल व प्रक्रिया उत्पादने, कलात्मक वस्तु, खाद्य पदार्थ आणि बचत गटांनी तयार केलेल्या गृहपयोगी वस्तु विक्रीसाठी उपलब्ध असतील.कृषि व्यवसायातील नवनवीन तंत्रज्ञानावर आधारीत प्रात्यक्षिके ही शेतकऱ्याऱ्यांना प्रत्यक्ष पाहण्याची संधी शेतकऱ्यांना प्रदर्शनात लाभेल. यामध्ये बायोडायनामिक पद्धतीने खत निर्मिती, सीपीपी कल्चर निर्मिती, गांडूळ खत निर्मिती, अझोला उत्पादन, १० ड्रम थेअरी, ड्रोन द्वारे फवारणी, भात नागवडीच्या विविध पद्धती, जैविक पद्धतीने किडनियत्रण इ. प्रात्यक्षिकांचा समावेश असणार आहे. शेतकऱ्यांना नविन तंत्रज्ञाना शेतीमध्ये नवनविन प्रयोग करणाऱ्या प्रगतशील शेतकऱ्याचा या प्रदर्शनात सत्कार केला जाणार हे. याशिवाय शासनाच्या विविध विभागाच्या योजनांची माहीती देणारे स्टॉलही प्रदर्शनात लावण्यात येतील . शेतकरी बंधुंसाठी माहीतीपुर्ण असणाऱ्या या कृषि विकास परीषद व कृषि प्रदर्शनास जास्तीत जास्त शेतकरी, ग्राहक तसेच नागरीकांनी भेट द्यावी असे आवाहन डॉ. संजय कोलते, जिल्हाधिकारी, भंडारा यांनी केले आहे.



## सिध्दीविनायक मंदिर न्यासा कडून भाविक भक्तांसाठी लागू करण्यात आलेल्या ड्रेस कोडला तृप्ती देसाई यांचा विरोध.

**मुंबई | प्रतिनिधी**

देश-विदेशातील लाखो भाविक मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिरात गणपतीच्या दर्शनासाठी येतात. सिद्धिविनायक मंदिर १८०१ साली बांधलं गेल्याचं सांगितलं जातं. मुंबईतील श्री सिद्धिविनायक मंदिर हे भारतातील सर्वात श्रीमंत मंदिरांपैकी हे एक आहे. या मंदिराची बांधणी देखील अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. मंदिरात गर्भगृहाच्या लाकडी दरवाजांवर अष्टविनायकाच्या प्रतिमा कोरण्यात आल्या आहेत. गर्भगृहाच्या आतील छतावर सोन्याचा मुलामा चढलेला असून मध्यवर्ती भागी गणेशाची मूर्ती आहे. हे मंदिर प्रभादेवी येथे असून सिध्दीविनायक नावाने प्रसिद्ध आहे.

मंदिराचे पावित्र्य राखण्यासाठी सिध्दीविनायक मंदिर न्यासाकडून भाविक भक्तांसाठी ड्रेस कोड नियम लागूसुप्रसिद्ध सिद्धीविनायक मंदिर प्रशासनाने भाविकांसाठी ड्रेस कोड लागू केला आहे. ड्रेसकोडनुसार कपडे परिधान केलेले नसतील तर मंदिरामध्ये भाविकांना प्रवेश नाकारला जाईल असं सांगण्यात आलं आहे. मात्र या नियमावरुन आता नवीन वादाला तोंड फुटण्याची शक्यता आहे.




सिद्धीविनायक मंदिर न्यासकडून लागू करण्यात आलेल्या या नियमाला सामाजिक कार्यकर्त्या तसेच भूमाता ब्रिगेडच्या अध्यक्षा तृप्ती देसाईंनी विरोध केला आहे. सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टने हा निर्णय मागे घेतला पाहिजे अशी मागणी तृप्ती देसाईंनी केली आहे. मंदिरात कोणते कपडे घालू यायचे हे भक्तांना चांगलं कळतं तुम्ही शिकवण्याची गरज नाही, असा टोलाही तृप्ती देसाईंनी लगावला आहे.

## मातोश्री आशाताई कुणावार महिला महाविद्यालयात मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन




**हिंगणघाट | प्रतिनिधी**

मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागातर्फे जागतिक मतदान दिनानिमित्त मतदार जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमेश तुळसकर, उपप्राचार्या डॉ. सपना जयस्वाल, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रतिभा दुबे, कला विभाग प्रमुख प्रा. भाग्यश्री साबळे, तसेच प्रा. अभय दांडेकर, प्रा. नवले, प्रा. इंगळे, प्रा. घाटे यांची उपस्थिती होती.यावेळी डॉ. सपना जयस्वाल यांनी विद्यार्थिनींना मतदानाचे महत्त्व समजावून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन प्रा. प्रतिभा दुबे यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थिनींनी सक्रिय सहभाग घेतला.

## करमाळ्यात अनेक युवकांचा युवासेनेत प्रवेश!
## गाव तेथे शाखा अभियान राबवणार-शंभूराजे फरतडे



**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा तालुक्यातील अनेक युवकांनी युवासेनेत प्रवेश केला असून, त्यांनी युवासेना प्रमुख आदित्यसाहेब ठाकरे यांच्या नेतृत्वाला बळकट करण्याचा निर्धार केला. युवासेना सचिव आमदार वरूण सरदेसाई, शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाहूदादा फरतडे, युवासेना जिल्हाप्रमुख सचिन बागल आणि उपजिल्हाप्रमुख मयूर यादव यांच्या मार्गदर्शनाखाली व युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांच्या नेतृत्वाखाली हा प्रवेश घेण्यात आला.

युवासेना तालुकाप्रमुख शंभूराजे फरतडे यांनी सांगितले की, लवकरच गाव तेथे शाखा अभियान राबवून युवासेनेची संघटनात्मक बांधणी मजबूत केली जाईल. यावेळी मोरवड येथील अमिर कबीर, उमेश कासव, पृथ्वीराज जाधव, तेजस कांबळे, तुषार नाळे, अजिंक्य भोसले, करण खिलारे, बापू कबीर आणि मंगेश पवार यांच्यासह अनेक युवकांनी युवासेनेत प्रवेश केला. शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाहूदादा फरतडे आणि मयूर यादव यांनी त्यांना शिवबंधन बांधून स्वागत केले.

या प्रसंगी शहर प्रमुख समिर हालवाई, उपशहर प्रमुख कल्पेश राक्षे, आदित्यस जाधव आणि शिवप्रताप युवा प्रतिष्ठानचे महेश काळे पाटील उपस्थित होते.

## सिंदीत हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव उत्साहात साजरा
### केक कापून भव्य लंगर महाप्रसादाचे आयोजन



**सिंदी (रेल्वे) | प्रतिनिधी**

हजरत बाबा मस्तान शाहा युवा फाऊंडेशन तर्फे हजरत बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांचा १५७ वा जन्मोत्सव सोमवारी, २७ जानेवारी रोजी मस्तान शाहा दर्गा येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या आयोजनासाठी मस्तान शाहा दर्गा परिसरात आकर्षक रंगबिरंगी रोषणाईने सजावट केली गेली होती. यावर्षी प्रथमच हिंदू-मुस्लिम एकतेचे प्रतीक असलेले बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांचा जन्मोत्सव भव्य पद्धतीने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात बाबा सय्यद मोहम्मद ताजुद्दीन यांच्या जन्मोत्सवानिमित्त केक कापून करण्यात आली. त्यानंतर सायंकाळी मस्तान शाहा दर्गा येथे भव्य लंगर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी हजारो भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला मोठा प्रतिसाद दिला, ज्यामुळे मस्तान शाहा दर्गा परिसर भक्तांच्या गर्दीने फुलून गेला.कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी हजरत बाबा मस्तान शाहा युवा फाऊंडेशनचे अध्यक्ष आदिल अजिम शाहा, रेहान हयात शाह, अलत्मश अजिम शाहा, महेफुज बबलु खान, रेहान अशनुर शाहा, साबिर मनसुर शाह, अनस नजिम शाहा, अदित्य चौरिवार, अजिम शाहा, अशनुर शाहा, मनसुर शाह नजिम शाह, हयात शाह, परवेज शाहा यांच्यासह अनेक कार्यकर्त्यांचा समावेश होता.

## जिल्हा नियोजन समितीची बैठक संपन्न; कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण असावीत-पालकमंत्री मेघना बोर्डीकर

**परभणी | लक्ष्मण उजगरे**

जिल्ह्यातील विकास कामांसाठी जिल्हा वार्षिक योजनेचा संपूर्ण निधी वेळेत खर्च करावा, सर्व कामे दर्जेदार व गुणवत्तापूर्ण असावीत, आणि निधी परत जाणार नाही, याची दक्षता विभागप्रमुखांनी घ्यावी, असे निर्देश परभणी जिल्ह्याच्या पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत दिले.




ही बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२९) पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीस खासदार फौजिया खान, आमदार रत्नाकर गुट्टे, आमदार राजेश विटेकर, जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नतिषा माथूर, जिल्हा पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी, महानगर पालिका आयुक्त धैर्यशील जाधव, निवासी उपजिल्हाधिकारी अनुराधा ढालकरी आणि जिल्हा नियोजन अधिकारी किशोरसिंग परदेशी यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी सांगितले की, जिल्ह्याचा सर्वांगिण विकास करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेचा निधी महत्त्वपूर्ण आहे. या निधीच्या माध्यमातून अनेक विकासकामे राबवली जातात, म्हणून या निधीचा वेळेवर आणि योग्य प्रकारे वापर होईल याची दक्षता घेतली पाहिजे. त्याचबरोबर, शाळा आणि अंगणवाड्यांच्या दुरुस्तीबाबत प्रत्यक्ष भेटी देऊन कामे तत्काळ पूर्ण केली जावीत.

दुरुस्तीसाठी प्राधान्य देताना, पालकमंत्री यांनी जिल्ह्यातील शहरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्याचे सूचित केले, तसेच प्राचीन मंदिरं, महत्त्वाच्या स्थळांची आणि यात्रा स्थळांची जतन आणि संवर्धन करण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचे निर्देश दिले.

खासदार फौजिया खान यांनी गड, किल्ले, आणि स्मारकांची देखरेख आणि संवर्धन करण्याच्या महत्त्वावर भर दिला. आमदार गुट्टे यांनी ग्रामीण भागातील ट्रान्सफॉर्मर दुरुस्ती, नियमित वीज पुरवठा, रुग्णवाहिकेच्या उपलब्धतेसाठी उपाययोजना सुचवल्या.

पालकमंत्री श्रीमती बोर्डीकर यांनी मानव निर्देशांकात जिल्हा अग्रेसर ठेवण्यासाठी सर्व विभागप्रमुखांनी कामे

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचारांचा गौरव, प्रजासत्ताक दिनानिमित्त कार्यक्रम

**बाभळेश्वर (राहुरी) | शहाजी दिघे**

विद्या विकास पब्लिक स्कूल व नाथाजी पाटील म्हस्के जुनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचारांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष रावसाहेब म्हस्के यांनी आपल्या मार्गदर्शनाने हा कार्यक्रम संपन्न केला.

कार्यक्रमाची सुरुवात ध्वजारोहण, राष्ट्रगीत व राज्यगीताने करण्यात आली. यावेळी भारताचे संविधान वाचन करण्यात आले, ज्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करण्यात आला. रावसाहेब म्हस्के यांनी सांगितले, प्रजासत्ताक दिन हा आपल्या देशाच्या स्वतंत्रतेचा आणि लोकशाही मूल्यांचा दिवस आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय संविधानाच्या निर्मितीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आणि लोकशाही भारताच्या भूमिमध्ये स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्व या मुलभूत तत्त्वांची रुजवण केली.




कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध भाषांमध्ये प्रजासत्ताक दिनाच्या महत्त्वावर भाषणे दिली. रावसाहेब म्हस्के यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून म्हणाले, आजचा दिवस आपल्या थोर नेत्यांच्या योगदानाची आठवण करून देतो. आपला देश प्रगती करत आहे, आणि आपण प्रत्येकाने आपल्या कर्तव्याची योग्य पारायण केली पाहिजे.

कार्यक्रमाच्या अंतर्गत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लोकशाही विचारांची महती सांगत त्यांचे योगदान गौरवण्यात आले. यावेळी नामदेवकाका म्हस्के, साहेबराव शिंदे, अण्णासाहेब म्हस्के, भागवतराव कडू, भोकनळ पाटील, राजेंद्र म्हस्के, राजेंद्र घोगरे, रावसाहेब कांदाळकर, चौधरी साहेब, उंडे साहेब, पत्रकार श्रीकांत मापारी, तसेच पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## पिशोर येथे पालक मेळाव्याचे आयोजन; मुलांच्या करिअर आणि संगणकाच्या महत्वावर मार्गदर्शन

**पिशोर | जावेद शेख**

कन्नड तालुक्यातील पिशोर येथे २९ जानेवारी रोजी एम के सि एल महामंडळ अंतर्गत एम टेक कॉम्पुटर सेंटरच्या वतीने पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. संजय गायकवाड आणि मुख्य मार्गदर्शक हर्षवर्धन शिरसाठ यांच्या हस्ते झाले.

हर्षवर्धन शिरसाठ यांनी आधुनिक युगात संगणकाच्या महत्त्वावर भाष्य करत मुलांच्या करिअरबाबत एम एस सी आय टी, एम एफ एस, के एल आय सी कोर्सेस, सारथी, अमृत कलश आणि करिअर कल चाचणी यासारख्या महत्त्वाच्या संधींबद्दल पालक आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच, व्ही ई डी एच चाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या भविष्याबद्दल अधिक माहिती मिळवण्याचे मार्गदर्शन केले.



डॉ. संजय गायकवाड यांनी संगणक ज्ञानाचे महत्त्व सांगत, आजच्या डिजिटल युगात कोणतीही माहिती सहजपणे मोबाईल द्वारे मिळवता येणे शक्य झाले आहे, असे उल्लेख केले.

एम टेक कॉम्पुटर सेंटरचे संचालक मनोज कोल्हे यांनी पालकांना संदेश दिला की, शाळेतील अभ्यास घरच्या मुलांकडून पूर्ण करून घेतला पाहिजे. मात्र, काही पालक मोबाईलमध्ये रील्स बघत बसतात, ज्यामुळे मुलं देखील मोबाईलचा गैरवापर करतात. त्यांनी पालकांना सूचना दिली की, मुलांना मोबाईलच्या माध्यमातून अभ्यासात्मक बाबी शिकवाव्यात, ज्यामुळे मोबाईलचा योग्य वापर होईल.

सहशिक्षक प्रकाश मैद आणि गीता नलावडे यांनी देखील विद्यार्थ्यांना मोलाचे मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य सुनील नवले, गणेश मोकासे, जावेद शेख, मुख्याध्यापक संतोष निकम, हभप भानुदास महाराज सुरडकर, श्रीमती मंजुषा बडक, पत्रकार भागीनाथ मोकासे, शांताराम मोकासे, पंढरी ढगे, शिवाजी ढगे, रामू कोल्हे, नंदू खडके, दत्तू ढगे, राजू सनांन्से आणि परिसरातील पालक उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .